MHKO030004162015	
	दाखल तारीख – १७/०१/२०१५
	नोंदणी तारीख – २२/०१/२०१५
	निकाल तारीख – ०८/०७/२०२६
	कालावधी - वर्षे महिने दिवस ११ ०५ २१

<u>कोल्हापूर येथील ६ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर</u>
<u>यांचे न्यायालयात,</u>
(पिठासीन अधिकारी श्री.एन.आर.भळगट)

<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्रं. ३००२८८/२०१५</u>
<u>निशाणी क्रं. ६१ /ब</u>.

श्री. अय्याज नसीर नणदीकर. व.व. ३१, धंदा - खाजगी व्यवसाय, रा. १३५१, लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापूर.		**फिर्यादी..**
- <u>विरुध्द</u> -		
श्री. जावेद महमंद मोरवे. व.व. ३२, धंदा - नोकरी, रा. घर नं. १६, कलानंद हौसिंग सोसायटी, विक्रमनगर ३ री गल्ली, कोलहापूर, सध्या - २३/१, प्रियदर्शनी कॉलनीसमोर, उचगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर.		**आरोपी..**

- दोषारोप -
परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ प्रमाणे

....
फिर्यादीतर्फे विद्वान विधीज्ञ - श्री. एस.एम.पाटील.
आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ - श्री.डी.ए.पाटील.
....

<u>न्या य नि र्ण य</u>

(घोषित दिनांक - ०८/०७/२०२६)

१. सदर खटला हा आरोपीविरुद्ध परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (संक्षीप्तपणे

यापुढे याचा उल्लेख “सदर कायदा” असा केला जाईल.) चे कलम १३८ अन्वये चालविण्यात आला.

<u>फिर्यादीची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे</u> -

२. फिर्यादी व आरोपी यांचे मित्रत्ववाचे संबंध असून फिर्यादी व आरोपी हे एकमेकांच्या अडीअडचणीला मदत करतात. आरोपीने त्याचे वैयक्तिक व व्यापारातील अडचणीसाठी रक्कम रु. ३,७०,०००/- (रुपये तीन लाख सत्तर हजार फक्त) इतक्या रक्कमेची आवश्यकता असलेने आरोपीने फिर्यादी यांना रक्कम रु.३,७०,०००/- (रुपये तीन लाख सत्तर हजार फक्त) हातऊसणे देणेसाठी विनंती केली. फिर्यादी यांनी आरोपीशी असलेल्या मैत्रीपुर्ण संबंधाचा विचार करुन आरोपीचे वैयक्तीक व व्यापारातील अडचण दूर करणेच्या हेतुने आरोपीने वेळोवेळी तीन टप्यात म्हणजेच दि. ०५/०३/२०१४ ते दि. ११/०४/२०१४ इ. रोजी पर्यंत या कालावधीमध्ये रक्कम रु. ३,७०,०००/- (रुपये तीन लाख सत्तर हजार फक्त) रोख स्वरुपात अदा केलेली होती. त्यापैकी काही रक्कम आरोपीच्या खातेस जमा केलेली आहे.

३. आरोपीने फिर्यादी यांचेकडून घेतलेल्या हातऊसण्या रक्कमेच्या परतफेडी-पोटी फिर्यादी यांना दि.१०/०८/२०१४ इ. रोजीचा त्याचे खाते असलेल्या आय.सी.आय.सी.आय बँक लि. मुख्य शाखा कोल्हापूर या शाखेवरील त्याचे खाते नं. ०१६६०१५१८७५९ या खातेवरील चेक क्र. १७९९७५ हा रक्कम रु. ३,७०,०००/- (रुपये तीन लाख सत्तर हजार फक्त) इतक्या रक्कमेचा त्यांचे स्वतःचे हाताने व सहीने लिहून दिला होता व दि. ०७/०५/२०१४ इ. रोजी तसे १००/- रु.च्या स्टॅम्प पेपरवर साक्षीदारांसमोर करारपत्र लिहून दिलेले आहे व सदर चेक वटणार व फिर्यादी यांनी आरोपी यांना दिलेली रक्कम मिळणार याची हमी व खात्री सदर करारपत्राने आरोपीने फिर्यादी यांना दिलेली होती. सदरचा चेक वटणेकरिता फिर्यादी यांचे खाते असलेल्या बँक दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि. कोल्हापूर येथे भरला असता सदरचा चेक "फंडस् इनसफिशिएंट" या शेऱ्यानिशी /मेमोनिशी न वटता दि.०७/११/२०१४ इ. रोजी परत आला. यापुर्वी देखील दि.२८/०८/२०१४ इ. रोजी आरोपीस पाठविलेली नोटीस आरोपीस लागू झालेनंतर आरोपीने फिर्यादी यांना भेटून दोन महिन्यानंतर पुन्हा चेक बँकेत भरा चेक वटेल अशी खात्री व हमी दिलेली होती. आरोपीच्या शब्दाखातर फिर्यादी यांनी आरोपीवर त्या नोटीसीआधारे फिर्याद दाखल न करता आरोपीच्या विनंतीनुसार पुन्हा चेक बँकेत भरला असता तो न वटता परत आलेला आहे. त्यानंतर दि.

१९/११/२०१४ इ. रोजी फिर्यादी यांनी त्यांचे वकिल अॅड. महांतेश कोले यांचेमार्फत आरोपी यांना कायदेशीर नोटीस पाटवून चेक न वठलेबाबत कळविले व सदर नोटीस पोहचलेपासून १५ दिवसाचे आत फिर्यादी यांची आरोपी यांनी घेतलेली बिनव्याजी कायदेशीर देय रक्कम रु. ३,७०,०००/- (रुपये तीन लाख सत्तर हजार फक्त) फिर्यादी यांना देवून आरोपीस पोहच घेणेस कळविले. सदर नोटीस आरोपीस दि. ०५/१२/२०१४ इ. रोजी लागू झाली. सदर नोटीस आरोपीस मिळूनही आरोपीने १५ दिवसाचे आत म्हणजेच दि. २०/१२/२०१५ इ. रोजी अखेर आरोपीने फिर्यादी यांचे कायदेशीर देय असणारी चेक रक्कम फिर्यादी यांना अदा केली नाही. त्यामुळे आरोपी यांनी आपल्या खात्यावर पुरेसे पैसे नाहीत हे माहीत असूनही न वटणारा चेक फिर्यादी यांना दिला. आरोपीने मुदतीमध्ये चेकची रक्कम भागविली नाही त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये फिर्याद दाखल केली आहे.

४. फिर्यादीच्या शपथेवरील जबाबावरुन व दाखल कागदपत्रांवरुन आरोपी विरुध्द परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये समन्स जारी केले. त्याच्या उत्तरादाखल आरोपी स्वतः हजर राहीला असता त्याला त्याच्यावरील गुन्हयाचा सारांश समजावून सांगणेत आला. आरोपीचे गुन्हयाचे घटक नि.१६ प्रमाणे नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून त्याचेविरुध्द प्रकरण पुढे चालविणेचा दावा केला.

५. आरोपीने फिर्यादीचा सखोल उलटतपास घेतला. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. २ म्हणून सुदर्शन बाळासाहेब सावंत, शाखाधिकारी कोल्हापूर अर्बन को. ऑप बँक यांची साक्ष नि. ५०, साक्षीदार क्र. ३ सलीम सिकंदर शेख, हॉटेल व्यवसाय यांची साक्ष नि. ५७, साक्षीदार क्र. ४ श्री. तुकाराम शंकर पाडेकर, वकीली व नोटीरी यांची साक्ष नि. ५८ वर नोंदवलेली आहे. त्यानंतर फिर्यादीने निशाणी ५९ खाली पुरसीस दाखल करून त्याचा पुरावा बंद केलेला आहे. आरोपीने केवळ फिर्यादीचा या प्रकरणात उलटतपास घेतलेला आहे. परंतु आरोपीतर्फे फिर्यादीचे इतर साक्षीदारांचा उलटतपास नोंदविणेत आलेला नाही. तसेच आरोपी संपरिक्षेकरीता हजर रहात नसल्याने नि.क्र.१ वरील दि.२२/०६/२०२६ रोजीच्या आदेशान्वये आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

६. फिर्यादी व फिर्यादीतर्फे विद्वान विधिज्ञ हजर. फिर्यादीचे विधीज्ञांचा युक्तीवाद

ऐकला. आरोपी व आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ गैरहजर राहील्याने त्यांचा युक्तीवाद ऐकण्यात आलेला नाही. फिर्यादीने दिलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे काळजीपूर्वक विवेचन करण्यात आले.

७. आरोपीच्या विरुध्दचे अपराधाचे विवरण सिध्द करण्याकरिता फिर्यादीने खालीलप्रमाणे पुरावा सादर केला -

अ) **तोंडी पुरावा** -

अ. क्र.	**साक्षीदारांची नावे**	**निशाणी क्रमांक**
१	श्री. अय्याज नसीर नणदीकर	१९
२	सुदर्शन बाळासो सांवत	५०
३	सलीम सिकंदर शेख	५७
४	श्री. तुकाराम शंकर पाडेकर	५८

ब) **कागदोपत्री पुरावा -**

अ. क्र.	**तपशील**	**निशाणी क्रमांक**
१.	आरोपीने फिर्यादीस लिहून दिलेले करारपत्र दि. ०७/०५/२०१४.	३४
२.	आरोपीने फिर्यादीस दिलेला आय.सी.आय.सी.आय बॅंकेचा चेक नं. १७९९७५ दि. १०/०८/२०१४.	३५
३.	बॅंकेचा रिर्टन मेमो दि. २०/०८/२०१४	३६
४.	आरोपीस पाठविलेली नोटीसची स्थळप्रत दि. २८/०८/२०१४	३७
५.	रजि. ए.डी. पोस्टाची बुकिंग रिसीट दि. २८/०८/२०१४	३८
६.	आरोपीस पाठविलेली नोटीसची स्थळप्रत दि. १८/११/२०१४	३९
७.	रजि. ए.डी. पोस्टाची पोहोच पावती दि. १९/११/२०१४	४०
८.	सदर नोटीस आरोपीला प्राप्त झालेचा पोस्टाचा दाखला.	४१
९.	चेक न वटता परत आलेचे चेक रिर्टन मेमो.	४२

१०.	रजि. ए.डी. पोस्टाची बुकिंग रिसीट दि. १९/११/२०१४	४३

८. **<u>आरोपीचा पुरावा</u>** -

आरोपीने त्याच्या बचावात कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा सादर केला नाही.

९. हा खटला निकाली काढत असताना माझे समोर पुढील मुद्दे उपस्थित झाले आहेत व त्या वरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद करीत आहे -

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१	आरोपीने फिर्यादीस त्याचे कायदेशीर देण्याच्या परतफेडीसाठी धनादेश (निशाणी क्रमांक ३५) दिले होते हे फिर्यादीने शाबीत केले आहे का ?	**होकारार्थी.**
२	फिर्यादीने कायदेशीर मुदतीत नोटीस देवून आरोपीकडे धनादेशातील रक्कमेची मागणी केल्याचे फिर्यादी सिध्द करतो का ?	**होकारार्थी.**
३	आरोपीने चलनक्षम दस्ताऐवज अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये अपराध केला आहे का ?	**होकारार्थी.**
४	आदेश काय ?	**अंतिम आदेशाप्रमाणे.**

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्रमांक २ बाबत</u> -

१०. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्टचे कलम १३८ पुढील प्रमाणे आहे -

<u>Section 138</u>	***Dishonour of cheque for insufficiency, etc., of funds in the account.*** - *Where any cheque drawn by a person on an account maintained by him with a banker for payment of any amount of money to another person from out of that account for the discharge, in whole or*

	in part, of any debt or other liability, is returned by the bank unpaid, either because of the amount of money standing to the credit of that account is insufficient to honour the cheque or that it exceeds the amount arranged to be paid from that account by an agreement made with that bank, such person shall be deemed to have committed an offence and shall, without prejudice to any other provisions of this Act, be punished with imprisonment for a term which may be extended to two years, or with fine which may extend to twice the amount of the cheque, or with both: Provided that nothing contained in this section shall apply unless— *(a) the cheque has been presented to the bank within a period of six months from the date on which it is drawn or within the period of its validity, whichever is earlier;* *(b) the payee or the holder in due course of the cheque, as the case may be,makes a demand for the payment of the said amount of money by giving a notice in writing, to the drawer of the cheque, within thirty days of the receipt of information by him from the bank regarding the return of the cheque as unpaid; and* *(c) the drawer of such cheque fails to make the payment of the said amount of money to the payee or, as the case may be, to the holder in due course of the cheque, within fifteen days of the receipt of the said notice.* *Explanation.— For the purposes of this section, "debt or other liability" means a legally enforceable debt or other liability.*

११. परक्राम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ प्रमाणे गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादीला खालीलप्रमाणे मुद्दे सिध्द करणे आवश्यक आहे. -

अ)	आरोपीने धनादेश कायदेशीर दायित्व पार पाडण्यासाठी दिला होता.
ब)	सदर धनादेश तीन महिन्यांच्या मुदतीत वटविण्यासाठी बँकेत जमा केला होता.
क)	सदर धनादेश "Funds Insufficient" असा शेरा मारुन न वटता बँकेतून परत आला.
ड)	धनादेश न वटता परत आल्यानंतर ३० दिवसांच्या आत धनादेश रकमेच्या मागणीकरिता नोटीस पाठविली,
इ)	सदर नोटीस आरोपीस मिळून सुध्दा त्याने धनादेशाची रक्कम मुदतीत दिली नाही

१२. या सर्व मुद्दयांचा व वस्तुस्थितीचा विचार होवून फिर्यादीने दिलेल्या पुराव्याचे सूक्ष्मपणे अवलोकन करणे गरजेचे आहे. फिर्यादीने आरोपीच्या वैयक्तिक व व्यापारातील अडचणीसाठी आरोपीस र.रु. ३,७०,०००/- ची आवश्यकता असलेने त्यास वेळोवेळी तीन टप्पयात दि. ०५/०३/२०१४ ते दि. ११/०४/२०१४ रोजी पर्यंत सदर रक्कम रोख स्वरूपात अदा केली होती व त्यापैकी काही रक्कम आरोपीच्या खात्यामध्ये जमा केलेली आहे. आरोपीने फिर्यादीकडून घेतलेल्या हातऊसणे रक्कमेच्या परतफेडीपोटी फिर्यादीस दि. १०/०८/२०१४ रोजीचा त्याचे आयसीआयसीआय बँक लि. शाखा कोल्हापूर या बँकेचा खाते असलेला रक्कम रूपये ३,७०,०००/- चेक नं. १७९९२५ हा कायदेशीर देणे देण्यापोटी सही करून दिला. सदरचा चेक नक्की वटेल असा विश्वास आरोपीने फिर्यादींना दिला होता. तसेच आरोपीने चेकची रक्कम देणे लागतो असे मान्य करून फिर्यादीस दि. ०७/०५/२०१४ रोजी तसेच र.रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर साक्षीदारांसमक्ष नोटरी करारपत्र लिहून दिले. आरोपीने फिर्यादीस दिलेला चेक फिर्यादीने त्यांचे दि. कोल्हापूर अर्बन को-ऑप बँक लि. कोल्हापूर या शाखेत त्यांचे खात्यात भरला असता सदर चेकच्या रक्कमेएवढी पुरेशी रक्कम आरोपीचे खात्यात शिल्लक नसलेमुळे सदरचा चेक न वटता फिर्यादीस 'Fund Insufficient' या शे-यानिशी बँकेने चेक मेमोसह दिनांक ०७/११/२०१४ रोजी परत पाठविलेला आहे. या पुर्वी देखील दि. २८/०८/२०१४ रोजी आरोपीस पाठविलेली नोटीस लागू झालेनंतर आरोपीने फिर्यादींना भेटून दोन महिन्यानंतर पुन्हा चेक बँकत भरा चेक वटेल अशी खात्री व हमी दिली. आरोपी यांचे

शब्दावर विश्वास ठेवून फिर्यादीने तो चेक पुन्हा बँकेंत वटणे करीता दिनांक ०७/११/२०१४ रोजी भरला असता सदरचा चेक त्याच दिवशी परत 'Fund Insufficient' या शे-यानिशी बँकेने चेक मेमोसह परत पाठविलेला आहे. अशा प्रकारे आरोपीने फिर्यादी संस्थेचे आर्थिक नुकसान केले आहे व करत आहेत.

फिर्यादीने त्याच्या पुराव्यात पुढे असे कथन केले आहे की, आरोपीने दिलेला चेक न वटता 'Fund Insufficient या शे-यानिशी बँकेने चेक परत पाठविलेले आहेत. सबब आरोपीने दिलेला चेक न वटता परत आलेमुळे फिर्यादी तर्फे विधीज्ञ श्री.महांतेश कोले यांचे मार्फत दि.१९/११/२०१४ इ. रोजी आरोपीस चेकची रक्कम फिर्यादी संस्थेस देणेबाबत १५ दिवसांची कायदेशीर नोटीस पाठविली असता सदरची नोटीस आरोपी यांनी स्वीकारून देखील आरोपी यांनी चेकची रक्कम आरोपीने अदा केलेली नाही. सदर नोटीस नि. ३९ वर दाखल आहे. सदर नोटीस आरोपीस रजि. पोस्टाने पाठविले बाबतची पोस्टल रिसीट नि. ४३ वर दाखल आहे. त्या पोस्टल बुकिंग रिसीटमध्ये सदर नोटीस आरोपीचे राहते पत्यावर पाठविणेबाबतचा पत्ता नमुद केलेचे दिसून येते.फिर्यादीने आरोपीच्या योग्य पत्यावर कायदेशीर मागणीची नोटीस पाठविलेची टपाल पावतीचा पुरावा अभिलेखावर सादर केला आहे. तसेच, संबंधीत टपाललेख वितरीत झालेचे दर्शविणारा भारतीय टपाल विभागाचा ट्रॅकिंग रिपोर्टही अभिलेखावर सादर केला आहे. सदर ट्रॅकिंग अहवालावर टपालाचा शिक्का किंवा अधिकारा-याची स्वाक्षरी नसली तरी तो भारतीय टपाल विभागाच्या अधिकृत ऑनलाईन ट्रॅकिंग प्रणालीमधून निर्माण झालेला इलेक्ट्रॉनिक अभिलेख आहे. त्याच्या सत्यतेवर किंवा विश्वासर्हतेवर संशय निर्माण करणारा कोणताही ठोस पुरावा आरोपीने न्यायालयासमोर सादर केलेला नाही. आरोपीकडून सदर पुराव्याचे प्रभावी खंडन करण्यात आलेले नसल्याने न्यायालय सदर ट्रॅकिंग अहवाल ग्राहय धरत आहे.

१३. सदर नोटीस आरोपीस प्राप्त झालेचा पोष्टाचा दाखला नि. ४१ खाली आहे. यावरून आरोपीला नोटीस प्राप्त झालेचे सिध्द होते. परिणामी सामान्य कलमे अधिनियम १८९७ चे कलम २७ अन्वये जर एखादी नोटीस योग्य पत्यावर पाठविली असेल तर विरूध्द पुरावा सिध्द होईपर्यंत ती नोटीस संबंधीत व्यक्तिला टपालाच्या नियमित कालावधीत मिळाली आहे हे कायद्याने निर्माण केलेले विशिष्ठ अनुमान फिर्यादीच्या बाजूने निर्माण होते. त्याचप्रमाणे पुरावा अधिनियमाचे कलम १४४ अन्वये न्यायालय मानवी वर्तन, नैसर्गिक घटना आणि व्यवसायाच्या सामान्य पध्दती लक्षात घेवून एखादी घटना घडली असेल असे अनुमान काढू

शकते. पत्र योग्य पत्त्यावर पाठविले असल्यास सामान्य परिस्थितीत ते प्राप्तकर्ता याला ते मिळाले असेल असे न्यायालय अनुमान काढू शकते. सदर अनुमान हे खंडनयोग्य असून त्यांना खोडून काढण्याचा भार प्राप्तकर्ता याचेवर असतो. परंतु आरोपीने फिर्यादीच्या उलटतपासात त्याला ही नोटीस मिळाली नाही ही बाब अभिलेखावर पुराव्यानिशी आणू शकलेला नाही. तसेच आरोपीने या केसमध्ये त्याला या केसमधील नोटीस प्राप्त झालेली नाही हे सिध्द करण्याकरिता स्वतःची साक्ष नोंदविली नाही अगर इतर साक्षीदारही तपासलेले नाही. नि. ४१ वरील पोष्टाच्या दाखल्यावरून सदर नि. ३९ ची नोटीस आरोपीस प्राप्त झालेचे सिध्द होते. करीता मी **मुद्दा क्र.२ यास होकारार्थी** उत्तर नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमांक १ व ३ बाबत</u> -

१४. या प्रकरणातील वस्तुस्थिती व पुरावा याचे विवेचन करणे अगोदर सदर कायद्यात असणा-या तरतुदी व धनादेशास असणारी गृहितके पाहणे जरुरीचे आहे. सदर कायद्याचे कलम ११८ व १३९ प्रमाणे धनादेश हा कलम १३८ प्रमाणे नमूद केलेल्या स्वरुपात दिला असल्यास व आरोपीची धनादेशावरील सही शाबीत झाल्यास सदरचा धनादेश हा कायदेशीर देण्याच्या परतफेडी करिता दिला असे गृहितक आहे. सदरचे गृहितक हे धारकाच्या हक्कात असून ते खंडनीय आहे.

१५. <u>निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्टचे कलम १३९ पुढीलप्रमाणे आहे.</u>

> *Section 139 :- **Presumption in favour of holder :-** "It shall be presumed, unless the contrary is proved, that the holder of a cheque received the cheque, of the nature referred to in Section 138, for the discharge, in whole or in part, of any debt or other liability."*

वरील तरतुदीमुळे सकृतदर्शनी मला असे गृहित धरावे लागेल की, आरोपी हे फिर्यादीला एकूण र. रुपये ३,७०,०००/- कायदेशीर देणे लागत होते आणि ते फेडण्यासाठी निशाणी क्रमांक ३५ वरील धनादेश क्र. १७९९७५ आला होता हे गृहितक खोडून काढण्याकरिता आरोपीने फिर्यादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही. शिवाय या गृहितकाच्या पुष्टीसाठी फिर्यादीने कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१६. सदर अधिनियमांचे कलम १३९ अन्वयेच्या गृहितकानुसार धनादेश धारण करणा-याने तो धनादेश त्याच्या कर्ज किंवा येण्याच्या अंशतः अथवा पूर्ण फेडीपोटी धारण केला आहे असे गृहित धरणे अनिवार्य असले तरी, फिर्यादीस आरोपीकडून धनादेशातील रकमेचे कायदेशीर येणे आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी धनादेश धारण करणा-या फिर्यादीची आहे.

१७. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्टचे कलम ११८ पुढील प्रमाणे आहे. -

Section 118 :	***Presumptions as to negotiable instruments.* —** Until the contrary is proved, the following presumptions shall be made :
(a)	of consideration — that every negotiable instrument was made or drawn for consideration, and that every such instrument, when it has been accepted, endorsed, negotiated or transferred, was accepted, endorsed, negotiated or transferred for consideration;
(b)	as to date —that every negotiable instrument bearing a date was made or drawn on such date;
(c)	as to time of acceptance —that every accepted bill of exchange was accepted within a reasonable time after its date and before its maturity;
(d)	as to time of transfer —that every transfer of a negotiable instrument was made before its maturity;
(e)	as to order of endorsements —that the indorsements appearing upon a negotiable instrument were made in the order in which they appear thereon;
(f)	as to stamps —that a lost promissory note, bill of exchange or cheque was duly stamped;
(g)	that holder is a holder in due course —that the holder of a negotiable instrument is a holder in due course: Provided

	that, where the instrument has been obtained from its lawful owner, or from any person in lawful custody thereof, by means of an offence or fraud, or has been obtained from the maker or acceptor thereof by means of an offence or fraud, or for unlawful consideration, the burden of proving that the holder is a holder in due course lies upon him.

१८. निशाणी क्रमांक ३५ वर धनादेश आहे. सदरचा धनादेश आय.सी.आय.सी.आय बँक शाखा राजारामपुरी, कोल्हापूर या खात्यावरचे आहेत. “Payee” म्हणून फिर्यादीचे नांव नमूद आहे. सदर धनादेश नि. क्र. र.रु. ३,७०,०००/- ऐवढी रक्कम लिहीण्यात आली आहे. सदर धनादेश क्र. १७९९७५ दि. १०/०८/२०१४ इ. रोजीचा आहे.

१९. फिर्यादीने सर्वसाधारणपणे फिर्यादीतील तक्रारीप्रमाणे निशाणी क्रमांक १९ वर पुरावा नोंदविला आहे. आरोपीतर्फे त्यावर फिर्यादीचा सखोल उलटतपास नोंदविण्यात आला. सदर उलटतपासात फिर्यादी व सलीम शेख यांनी आरोपीच्या पेप्सीच्या व्यवसायामध्ये भागीदारीसंदर्भात विचारणा केली व त्या व्यवसायात आरोपी नफा देईल म्हणून रक्कम गुंतवली ही बाब फिर्यादीने त्याच्या उलटतपासात स्पष्टपणे नाकारलेली आहे. फिर्यादीने पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात आरोपीस त्याच्या व्यापारातील व वैयक्तिक अडचण भागविण्याकरीता र.रू. ३,७०,०००/ दिल्याचे कथन केले आहे. सदर र.रू. ३,७०,०००/- मिळालेबाबत आरोपीने फिर्यादीस दि. ०७/०५/२०१४ रोजी र.रू. १०० च्या स्टॅम्प पेपरवर साक्षीदारांसमक्ष नोटरी करारपत्र लिहून दिलेले आहे. सदर नोटरी करारपत्र नि. ३४ खाली दाखल आहे. सदर नोटरी करारात दि. ०५/०३/२०१४ ते ११/०४/२०१४ या कालावधीत तीन टप्यात वेळोवेळी आरोपीने फिर्यादी कडून रोख स्वरूपात व त्याचे खात्यावर फिर्यादीकडून र.रू. ३,७०,०००/- मिळाल्याचे मान्य केले आहे व त्याचे कायदेशीर देणे देण्यापोटी या केसमधील वादातीत धनादेश आरोपीने फिर्यादीस दिल्याचे मान्य केले आहे. यावर आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी.ए. पाटील यांनी फिर्यादीचा सखोल उलटतपास घेतला त्यांनी फिर्यादीच्या उलटतपासात फिर्यादीने आरोपीस धमकी देवून त्याच्याकडून वेळोवेळी चार ते पाच धनादेश घेतलेले आहेत असे विचारले असता सदर बाब फिर्यादीने स्पष्टपणे नाकारलेली आहे. फिर्यादीने त्याचया

उलटतपासात आरोपीस र.रू. ३,७०,०००/- दिले असे दर्शविनारी लेखी नोंद ठेवलेली नाही व येणे असलेली रक्कम आयकर विवरण पत्रात देखील दाखवलेली नाही हे मान्य केले आहे. परंतु अशी कोणतीही रक्कम आरोपी देणे लागत नसल्यामुळे सदर रक्कम विवरण पत्रात दाखलविली नाही ही बाब फिर्यादीने स्पष्टपणे नाकारलेली आहे. त्याचप्रमाणे नि. ३४ च्या करारावरील मजकूर फिर्यादीने स्वतः टंकलिखीत करून आणला होता व त्या करारावरील मुद्रांक फिर्यादीने आरोपीस मारहाण करण्याची धमकी देवून खरेदी करण्यास लावला होता व नोटरी समोर आरोपकडून लिहून घेतला ही बाब फिर्यादीने स्पष्टपणे नाकारलेली आहे. एकूणच आरोपीचा बचाव असा आहे की, फिर्यादीने आरोपीस बळजबरी मुद्रांक खरेदी करण्यास भाग पाडले व मारहाण करण्याची धमकी देवून सदरचा करार नोटरीसमोर आरोपीकडून लिहून घेतला, परंतु त्याबाबत आरोपीने कोठेही पोलिस स्टेशनला तक्रार केली असे रेकॉर्ड अभिलेखावर दाखल केलेले नाही. आरोपीचा बचाव केवळ असा आहे की, फिर्यादीने आयकर विवरण पत्रात आरोपीस सदर रक्कम नमूद केले नाही केवळ त्यावरून फिर्यादीने आरोपीस रक्कम दिली नाही असा निष्कर्ष काढता येणार नाही. आयकर विवरण पत्रात सदर रक्कम नमूद केली नाही म्हणून आयकर कायद्यानुसार योग्य त्या कायदेशीर कारवाईला फिर्यादी सामोरे जाण्यास जबाबदार आहे परंतु त्यावरून केवळ आयकर विवरण पत्रात रक्कम नमूद नाही म्हणून फिर्यादीने आरोपीला पैसे दिले नाही असा अनुमान काढता येणार नाही.

२०. आरोपीतर्फे फिर्यादीच्या उलटतपासात दि. ०५/०३/२०१४ ते १४/०४/२०१४ या कालावधीत फिर्यादीकडे र.रू. ३,७०,०००/- होते असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही असा प्रश्न विचारण्यात आला, परंतु नि. ३४ वरील करारनाम्यातच फिर्यादीकडून आरोपीस र.रू. ३,७०,०००/- प्राप्त झालेचे आरोपीने मान्य केलेले आहे. सदर करारनामा बळजबरीने त्याच्याकडून मारहाण करण्याची धमकी देवून लिहून घेण्यात आला असा जरी आरोपीचा बचाव असला तरी आरोपीने त्याबाबत पोलीस स्टेशन अथवा योगय त्या सक्षम प्राधिका-यांपुढे याबाबत तक्रार केले बाबातचे पुरावा अभिलेखावर दाखल नाही. खरोखरच असा प्रकार झाला असता तर आरोपीने नैसर्गिक रित्या त्या बाबत तक्रार केली असती, परंतु आरोपीने तशी कोणतीही तक्रार केलेली नसल्यामुळे आरोपीचा बचाव हा न्यायबुध्दीस व तर्क बुध्दीस पटनारा नाही. आरोपीने धनादेशावरील त्याची सही व हस्ताक्षर त्याचे नसल्याबाबतचा बचाव घेतलेला आहे. परंतु सदर धनादेशावर हस्ताक्षर व सही नाही हे सिध्द करण्याकरीता आरोपीने बँक साक्षीदार तपासलेला नाही अथवा हस्ताक्षर तज्ञांकडुन सदर

धनादेशावरील सही व हस्ताक्षर आरोपीचे नाही म्हणून त्या धनादेशाची तपासणी व्हावी म्हणून देखील प्रयत्न केले नाही त्यामुळे केवळ धनादेशावर आरोपीचे सही व हस्ताक्षर नाही या तोंडी कथनात तथ्य अढळून येत नाही.

२१. आरोपीतर्फे फिर्यादीचा सखोल उलटतपास घेण्यात आला. त्या उलटतपासात फिर्यादीने नि. ३६ खाली दाखल केलेल्या मेमोवर बँकेचे सील अथवा स्वाक्षरी नाही असा प्रश्न विचारण्यात आला व त्या अनुषंगाने वादातीत धनादेश वटण्याकरीता बँकेत भरला नव्हता व सदर नि. ३६ चा मेमो फिर्यादीने खोटा व बनावट तयार केला असा प्रश्न फिर्यादीस उलटतपासात विचारण्यात आला, परंतु सदर बाब फिर्यादीने त्याच्या उलटतपासात स्पष्टपणे नाकारलेली आहे. नि. ३३ वरील मेमोवर बँकेचा शिक्का अथवा संबंधीत अधिका-याची स्वाक्षरी नाही. परंतु सदर रिपोर्ट हा सिस्टीम जनरेटेड रिपोर्ट असून त्यावर सहीची आवश्यकता नाही असा शेरा आहे. तसेच फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. २ म्हणून सुदर्शन बाळासो सावंत शाखाधिकारी कोल्हापूर अर्बन को. ऑप. बँक यांची साक्ष नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने फिर्यादी यांचे खाते त्यांच्या बँकेत असून या केसमधील वादातीत धनादेश हा त्यांच्या बँकेकडे वटणेकामी जमा झाला होता व तो धनादेश आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे न वटता परत आला या केसमध्ये दाखल असलेला चेक रिर्टन मेमो हा त्यांच्याच बँकेने फिर्यादीला दिला होता व तो तोच असलेचे सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत कथन केले आहे. तसेच सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीदरम्यान फिर्यादीच्या खात्याचा खातेउतारा दाखल केला आहे. सदर खातेउतारा सदर साक्षीदाराचे साक्षीत शाबीत झाला आहे तो नि. ५२ वर आहे. त्या खातेउता-यात देखील या केसमधील वादातीत धनादेश वटणेकरीता फियादीच्या बँकेत जमा झाला होता व तो आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे न वटता परत आला होता त्यामुळे तो चेक रिर्टन मेमो हा खोटा व बनावट आहे या आरोपीच्या बचावात देखील तथ्य आढळून येत नाही. आरोपीस संधी मिळून देखील आरोपीने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही.

२२. आरोपीने फिर्यादीकडून त्याची वैयक्तिक व व्यापारातील अडचण भागविणेकरीता र.रू. ३,७०,०००/- इतके घेतले होते व ते परतफेड करण्याकरीता दि. ०७/०५/२०१४ रोजी फिर्यादीच्या लाभात नि. ३४ चे करारपत्र लिहून दिले होते. त्या रक्कमेच्या परतफेडीपोटी आरोपीने फिर्यादीस या केसमधील धनादेश अदा केला होता असे कराराद्वारे मान्य केले होते हे सिध्द करण्याकरीता फिर्यादीने साक्षीदार क्र. ३ म्हणून सलीम

सिकंदर शेख याची साक्ष नोंदवलेली आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत आरोपीने फिर्यादीच्या लाभात नि. ३४ चा करारनामा त्याच्या समक्ष लिहून दिला होता हे त्याच्या साक्षीत कथन केले आहे. त्या दस्तावरील सह्या फिर्यादी, आरोपी व साक्षीदार म्हणून त्याची व दुसरा साक्षीदार म्हणून विक्रमादित्य रमेश बिडकर यांची सही असलेचे कथन केले आहे. आरोपीने केवळ या केसमध्ये फिर्यादीचा उलटतपास घेतला आहे. परंतु नि. ३४ च्या करारपत्रावरील साक्षीदार याचा उलटतपास आरोपीतर्फे घेण्यात आलेला नाही. त्यामुळे नि. ३४ वरील करारनामा हा सिध्द झालेला आहे.

२३. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ४ म्हणून तुकाराम शंकर पाडेकर यांची साक्ष नोंदविणेत आली. त्यांनी त्यांच्या साक्षीत नि. ३४ चा दस्त दि. ०७/०५/२०१४ रोजी त्यांच्या पुढे नोटरी रजि. क्र. ३३६६/२०१४ अन्वये नोंदविण्यात आला. असे त्यांच्या साक्षीत कथन केले. फिर्यादी आरोपी व साक्षीदार यांनी सदर दस्तावर त्यांच्या समक्ष सह्या केल्या असे सदर साक्षीदाराने त्यांच्या साक्षीत कथन केले. सदर साक्षीदाराचा देखील आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आलेला नाही. एकूणच फिर्यादीने त्याच्या साक्षीपुराव्यातून आरोपीने फिर्यादीकडून त्याच्या वैयक्तिक व व्यापारातील अडचणीकरीता र.रू. ३,७०,०००/- हातऊसणे घेतले होते व ते परतफेड करण्याकरीता नि. ३४ चा करार फिर्यादीचे लाभात लिहून दिला व त्याच करारपत्रात फिर्यादीची कायदेशीर देणी देण्यापोटी आरोपीने या केसमधील वादातीत धनादेश फिर्यादीचे लाभात दिला हे सिध्द झालेले आहे. आरोपीने धनादेशावरील त्याची सही नाकारलेली आहे परंतु सदर धनादेशावर त्याची सही नाही हे सिध्द करण्याकरीता आरोपीने बँक साक्षीदार अथवा तज्ञ साक्षीदारांमार्फत धनादेशावरील सही त्याची नाही हे सिध्द करण्याकरीता सदर धनादेश हा हस्ताक्षर तज्ञांमार्फत तपासून मिळावा म्हणून देखील प्रयत्न केलेले नाही. फिर्यादीने आरोपीकडून या केसमधील वादातीत धनादेश व नि. ३४ वरील करारनामा हा मारहाण करण्याची धमकी देवून लिहून घेतला असा आरोपीचा बचाव आहे परंतु त्याबाबत आरोपीने कोठेही पोलिस स्टेशनला तक्रार केलेली नाही त्यामुळे आरोपीच्या बचावात तथ्य आढळून येत नाही. या केसमधील आरोपीच्या खात्याचा वादातीत धनादेश फिर्यादीच्या ताब्यात कसा आला व तो परत घेण्याकरीता आरोपीने काय प्रयत्न केले हे देखील अभिलेखावर आलेले नाही. तसेच आरोपीने फिर्यादीच्या चेक अनादरीत झालेनंतर पाठविलेल्या कायदेशीर नोटीसीस उत्तर देखील दिलेले नाही. त्यामुळे आरोपीने त्याचा बचाव हा त्याला फार पुर्वी संधी असताना देखील नोटीस उत्तर देवून मांडलेला नाही. त्यामुळे देखील आरोपीच्या बचावात तथ्य

आढळून येत नाही.

२४. आरोपीने फिर्यादीच्या उलटतपासात प्रस्तुतची केस ही मुदतीत नाही असा बचाव घेतलेला आहे. या केसचे अभिलेख तपासून पाहता या केसमधील वादातीत धनादेश प्रथम अनादरीत झालेनंतर फिर्यादीने आरोपीस नोटीस देवूनही फिर्याद दाखल न करता धनादेश दुस-या वेळी अनादरीत झालेनंतर प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. त्यामुळे सदर फिर्याद ही मुदतीत आहे का हे देखील तपासून पाहणे गरजेचे आहे. या केसमधील धनादेश हा दि. १०/०८/२०१४ या तारखेचा आहे. सदर धनादेश हा फिर्यादीने दुस-या वेळी म्हणजेच दि.०७/११/२०१४ रोजी वटण्याकरीता भरलेला आहे. म्हणजेच सदर धनादेश हा धनादेशावरील तारखेपासून ३ महिन्याच्या आत विहीत मुदतीत / वैधता कालावधीत वटणेकरीता फिर्यादीने त्याच्या बँकेत जमा केलेला आहे. फिर्यादीने त्याच्या फिर्यादीत व पुराव्यात सदर धनादेश आरोपीच्या सांगण्यावरून पहिल्यांदा न वटता परत आलेनंतर २ महिन्यानंतर पुन्हा बँकेत वटण्याकरीता जमा केला होता असे कथन केले आहे. फिर्यादीने असे देखील कथन केले आहे की, आरोपीच्या या आश्वासनावर विश्वास ठेवून फिर्यादीने सदर धनादेश त्याच्या वैधता कालावधीत पुन्हा सादर केला. दुस-यांदाही धनादेश अनादरीत झालेनंतर फिर्यादीने नियमानुसार पुन्हा कायदेशीर नोटीस पाठविली आणि विहीत मुदतीत फिर्याद दाखल केली. कायद्याचे स्थापित तत्व असे आहे की, धनादेश त्याच्या वैधता कालावधीत कितीही वेळा सादर करता येतो. प्रत्येक अनादरामुळे स्वतंत्र कारण निर्माण होते. **मा. सर्वोच्च न्यायालय यांनी एम.एस.आर. लेदर्स वि. एस. पलानियाप्न्न** या न्यायनिवाडयात असे स्पष्ट केले आहे की, धनादेश त्याच्या वैधता कालावधीत एकापेक्षा अधिकवेळा सादर करण्यास कोणताही कायदेशीर प्रतिबंध नाही. पुर्वीच्या अनादरावर तक्रार दाखल केली नसली तरी, धनादेश पुन्हा त्याच्या वैधता कालावधीत सादर करून त्यानंतर झालेल्या अनादराच्या आधारे कलम १३८ मधील सर्व अटी पुर्ण करून दाखल केलेली तक्रार कायदेशीर व ग्राह्य आहे त्यामुळे सदर तक्रार ही मुदतीबाहेरची नसून कायदेशीररित्या मुदतीत दाखल करण्यात आलेली आहे म्हणून आरोपीचा सदर फिर्याद ही मुदतीत नाही हा आक्षेप ग्राह्य धरता येत नाही.

२५. एकूणच आलेल्या साक्षीपुराव्यावरून आरोपीने फिर्यादीचे कायदेशीर देणे देण्यापोटी या केसमधील धनादेश फिर्यादीस जारी केला व तो न वटता परत आला. चेक रक्कमेची नोटीस मिळूनही आरोपीने फिर्यादीची चेकची रक्कम भागविलेली नाही. आरोपी यास

पुरेशी संधी मिळून देखील त्याने फिर्यादीच्या इतर साक्षीदारांचा उलटतपास घेतलेला नाही अगर त्याच्या फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ चे निवेदन देखील नोंदविलेले नाही अगर स्वतःची साक्ष देखील नोंदविलेली नाही अगर त्याच्या बचावात कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. आरोपीने त्याचा बचाव संभाव्य पुराव्याआधारे व संभाव्य शक्यतेवर सिध्द केलेला नाही अथवा फिर्यादीच्या केसबाबत कोणताही संशय निर्माण केलेला नाही त्यामुळे वरील सर्व कारणमिमांसेचा विचार करता आरोपीने परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये अपराध केल्याचे फिर्यादीने सिध्द केलेले आहे. करिता मी मुद्दा क्रमांक १ व ३ याचे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे. त्यामुळे मी या निष्कर्षापर्यत पोहोचलो आहे की, आरोपीने वादातीत धनादेशाबाबत परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ चा गुन्हा केला आहे. मी आरोपीस सिध्द दोषी घोषित केल्याने या ठिकाणी त्यांस शिक्षेबाबत ऐकण्याकरीता अल्पविराम घेत आहे.

Digitally signed by NITIN RAMESH BHALGAT
Date: 2026.07.08 15:23:58 +0530

कोल्हापूर.
दिनांक. ०८/०७/२०२६

(श्री.एन.आर.भळगट)
६ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोल्हापूर.

२६. फिर्यादी, फिर्यादीतर्फे विद्वान विधिज्ञ, आरोपी व त्याचेतर्फे विद्वान विधिज्ञ यांना दुपारी १.०० वा.पर्यंत सतत पुकारले असता गैरहजर. फिर्यादी व फिर्यादीचे विधीज्ञ यांनी त्याच्या युक्तीवादात असे कथन केले की आरोपीने फिर्यादीची धनादेशाची रक्कम मागील १० वर्षापासून न भागविलेमुळे फिर्यादीचे मानसिक व आर्थिक अतोनात नुकसान झाले आहे करीता आरोपी कायद्यानुसार योगय ते शासन व्हावे.

२७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपी अनेक तारखांपासून गैरहजर आहे. आरोपीच्या उपस्थितीकरीता प्रस्तुत खटला विनाकारण मागील अनेक तारखांपासून न्यायप्रविष्ठ राहील्याचे दिसून येते. प्रस्तुतचे प्रकरण हे सन २०१५ सालातील आहे. सदर रक्कम फिर्यादीने कोठेही राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक केली असती तर त्यावर फिर्यादीला वार्षिक ८ टक्के परतावा मिळाला असता. सदर बाब देखील आरोपीस शिक्षा देतेवेळी विचारात घेणे आवश्यक आहे करीता, सदर बाब विचारात घेता मी आरोपी यांस कायद्याने नमूद आवश्यक ती शिक्षा देणे उचित समजतो.

मुद्दा क्रमांक ४ करिता -

२८. मुद्दा क्रमांक १ ते ३ चे विवेचन आणि निष्कर्ष विचारात घेता मुद्दा क्रमांक ४ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१	आरोपी **श्री. जावेद महमंद मोरवे** यास परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ च्या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये दोषी ठरविण्यात येत आहे.
२	आरोपीस **चार महीने साधा कारावास** आणि **दंड रक्कम रु.७,४०,०००/-** (अक्षरी रुपये सात लाख चाळीस हजार मात्र) ठोठावण्यात येत आहे. दंडाची रक्कम फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७(१)(ब) प्रमाणे फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून आजपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात जमा करावेत.
३	वरीलप्रमाणे आरोपीने रक्कम जमा केलेस अपीलाचा कालावधी संपल्यानंतर फिर्यादीस सदरची रक्कम अदा करणेत यावी.
४	आरोपीने जामीनकदबा अभ्यर्पित करावा.
५	आरोपी याचेविरुध्द शिक्षेच्या अंमलबजावणीचे वॉरंट फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१८ (२) अन्वये जारी करण्यात यावे.
६	या निकालाची आणि आदेशाची एक प्रत आरोपी यांस निशुल्क देण्यात यावी.
	(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करणेत आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NITIN RAMESH BHALGAT
Date: 2026.07.08 15:24:28 +0530

कोल्हापूर.
दिनांक.०८/०७/२०२६

(श्री.एन.आर.भळगट)
६ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोल्हापूर.